दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | बुधवार | 11 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 264 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com






# रोहित पवारांचे सवाल; उत्तरे मिळणार की प्रश्न हवेत विरणार ?

## हा घातपात की अपघात?, अजित पवारांच्या निधनावर रोहित पवारांचे पुरावे; पायलटची मुद्दाम 'हिरोगिरी' का?

## रोहित पवार यांनी विमान अपघाताच्या तपशीलावर प्रेझेंटेशन करून अनेक सवाल उपस्थित केले आहेत

## बाहेरील एजन्सीमार्फत तपासाची मागणी





हा केवळ तांत्रिक बिघाड किंवा नैसर्गिक अपघात नसून त्यामागे काही मोठे षड्यंत्र असण्याची शक्यता रोहित पवारांनी वर्तवली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, केंद्र सरकारच्या किंवा एखाद्या निष्पक्ष बाहेरील एजन्सीमार्फत या प्रकरणाचा सखोल तपास व्हावा, जेणेकरुन सत्य समोर येईल, असे त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

मुंबई | वृत्तसंस्था

28 जानेवारी रोजी सकाळी 8 वाजून 46 मिनिटांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. हा दुर्घटना प्रसंग संपूर्ण राज्यातून आणि राष्ट्रीय पातळीवर चर्चेचा विषय बनला आहे. अपघातानंतर अनेकांनी दुर्घटनेच्या कारणांबद्दल तसेच विमानसेवेच्या तांत्रिक बाबींबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी विमान अपघाताच्या तपशीलावर प्रेझेंटेशन करून श्रृंखलेनं अनेक सवाल उपस्थित केले आहेत. त्यांनी सांगितले की, या गंभीर अपघाताच्या पार्श्वभूमीवर सुस्पष्ट आणि पुराव्यांवर आधारित उत्तरे मिळणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ काका नसून, देशाच्या विमान सुरक्षा व्यवस्थेवरील प्रश्नांसाठीदेखील या सर्वांची उत्तरं मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

### रोहित पवार यांचे मुख्य प्रश्न

विमान देखभाल व तपासणी बाबत

VSR कंपनीने उड्डाणापूर्वी विमानाची तपासणी केली होती का?

आणि ती तपासणी कोणत्या कर्मचाऱ्यांनी केली होती?

विमानाचा तकनिकी रेकॉर्ड (Techlog) कुठे आहे?

विमानाची उडण्याची पात्रता अहवाल (Airworthy Report) सादर केला गेला आहे का?

विमानाची नियमित देखभाल (Maintenance) केली होती का? ती कोणत्या एजन्सी/कंपनीने केली?

विमानाची मोठी दुरुस्ती किंवा ओव्हरहॉल झाली होती का? त्याचा तपशील आणि अहवाल कुठे आहे?

पूर्वीच्या दुर्घटना अहवालांची अंमलबजावणी

सप्टेंबर 2023 मध्ये मुंबईत लिअरजेट विमानाचा अपघात झाला होता.त्या अपघाताचा अहवाल दोन वर्षांनंतरही का प्रकाशित झाला नाही?

अजित पवारांच्या अपघातानंतरही VSR कंपनी अजून कशी कार्यरत आहे? आवश्यक सुधारणा किंवा निर्बंध का लादले जात नाहीत?

### फ्लाइट सेफ्टी सिस्टम व SOP चा प्रश्न

विमानातील कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर (CVR) का बंद ठेवण्यात आला होता?

उत्पादक कंपनीच्या नियमांचे (SOP – Standard Operating Procedures) पालन का केले जात नाही?

या विमानात Stall Warning System (झपाट्याने उंची गहाळ होण्याची चेतावणी यंत्रणा) का बंद होती?

पायलट आणि क्रू निवडीबाबत प्रश्न

पहिल्या पायलट साहिल मदान व को-पायलट यश यांना बदलून मुख्य पायलट सुमित कपूर व को-पायलट शांभवी पाठक यांना का नियुक्त केले?

सकाळी 7:02 वाजता "All crew reached AirPort" असा मेसेज आला, परंतु नियोजित उड्डाण वेळ सकाळी 7 होती.

अशा लवकर सकाळी ट्रॅफिक अडचणी कोणत्या ठिकाणी होत्या?

एखादा पायलट ट्रॅफिकमध्ये अडकला असता तर दोघांच्या बदलामुळे निर्णय का झाला?

सुमित कपूर यांचा ट्रॅक रेकॉर्ड कमजोर असताना अजित पवारसारख्या VVIP व्यक्तीचे विमान त्यांच्या जबाबदारीवर का ठेवले गेले?

ATC (एअर ट्राफिक कंट्रोल) आणि वेळा भिन्नता

केंद्राच्या अहवालानुसार सकाळी 8:18 वाजता विमान बारामती ATC च्या संपर्कात आले,

तर बारामती ATC नुसार 8:19 वाजता संपर्क झाला.

या एका मिनिटाचा फरक कसा झाला?

8:27 वाजता रनवे 29 ची परवानगी मागण्यात आली;

8:29 वाजता रनवे 11 ची परवानगी मागण्यात आली;

नंतर पुन्हा 8:36 वाजता परवानगी बदलण्यामागे का असा निर्णय होता?

### दृष्यमानता व अपघात स्थितीबद्दल प्रश्न

बारामती ATC नुसार सकाळी 8:31 वाजता दृष्यमानता 3 किलोमीटर होती;

तर अॅरोने सकाळी 7:10 वाजता दृष्यमानता "OK" असल्याचे का नमूद केले?

अपघाताच्या वेळेस (सकाळी 8:43:55) को-पायलटने "Oh Shit, Oh Shit" असे म्हटले. सामान्यतः अशा प्रसंगी "मे डे" किंवा आणखी गंभीर चेतावणी ऐकायला मिळते;

मुख्य पायलट त्या क्षणी शांत का होता?

# अंबाजोगाईत कला दर्पण महोत्सव जल्लोषात साजरा

## आनंदी राहण्यासाठी अंगामध्ये कला असणे आवश्यक – डॉ.राजेश इंगोले

## डॉ.राजेश इंगोले हे अष्टपैलू व्यक्तिमत्व – राजकिशोर मोदी

## कला दर्पण महोत्सवाच्या माध्यमातून डॉ.इंगोले यांनी डॉक्टरांना सशक्त सांस्कृतिक मंच दिला – राज्याध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)



इंडियन मेडिकल असोसिएशनच्या कला दर्पण २०२५-२६ मधील राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धांचे पारितोषिक वितरण कार्यक्रम अंबाजोगाई येथील परिचय हॉल येथे नुकताच संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे होते. तर उद्घाटक म्हणून अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांची उपस्थिती होती. यावेळी या संस्कृतिक मंचावर इंडियन मेडिकल असोसिएशनचे भूतपूर्व अध्यक्ष डॉ.रवींद्र कुटे, अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, स्वारातीचे अधिष्ठाता डॉ.अरविंद बगाटे, नेतृत्व विभागाचे प्रमुख ज्ञानोबा दराडे, समितीच्या उपाध्यक्ष डॉ.पल्लवी दोडके, महाराष्ट्राच्या सहसचिव गितांजली शर्मा, स्थानिक शाखेचे उपाध्यक्ष डॉ.विजय लाड, सचिव डॉ.उद्धव शिंदे, कोषाध्यक्ष डॉ.बळीराम मुंडे, महिला विभाग अध्यक्ष डॉ.मनीषा राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ.रामकृष्ण लोंढे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या स्वागत समारंभाने झाली. आपल्या उद्घाटकीय भाषणात बोलताना राजकिशोर मोदी यांनी इंडियन मेडिकल असोसिएशनचा हा कला दर्पण कला महोत्सव अंबाजोगाई येथे होत आहे. या गोष्टीचा अत्यंत आनंद आहे. त्याबद्दल संघटनेचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांचे मी आभार व्यक्त करतो. आयएमएच्या कला दर्पण महोत्सवामुळे महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून पुस्तकांचे गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या आमच्या अंबाजोगाई मध्ये सर्व डॉक्टर्स कलाकार मंडळी आली. त्यांचा हा राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ सोहळा येथे आयोजित करणाऱ्या सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष असणारे आमचे सहकारी डॉ.राजेश इंगोले यांनी हा योग घडवून आणला त्याबद्दल त्यांचेही मी आभार व्यक्त करतो. डॉक्टर हा सुद्धा एक माणूस असतो. त्यालाही त्याचे जीवन असते. त्याच्या मध्येही एक कलाकार लपलेला असतो. परंतु, या धकाधकीच्या जीवनामध्ये आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळत असताना त्याला नाईलाजाने आपल्या सुप्त गुणांना दाबून ठेवावे लागते. याचं कारण म्हणजे डॉक्टरांसाठी असा वेगळा सांस्कृतिक कला महोत्सव नव्हता. परंतु, डॉ.राजेश इंगोले यांनी दूरदृष्टीपणाने गेल्या तीन वर्षांपासून सातत्यपूर्ण रितीने इंडियन मेडिकल असोसिएशनचा कला दर्पण हा सशक्त सांस्कृतिक कला मंच महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्सना उपलब्ध करून दिला आणि त्याचे फळ म्हणून आज एवढ्या प्रचंड संख्येने महाराष्ट्रातील डॉक्टर्स मंडळी आपल्या विविध कला येथे सादर करीत आहेत. आणि आपल्या जीवनाचा आनंद घेत आहेत. मला वाटतं एखाद्या कार्यक्रमाचे यश हे त्या माणसाने केलेल्या मेहनतीचे फळ असतं आणि डॉ.इंगोले हे त्यांना मिळालेल्या प्रत्येक पदाचा उपयोग संपूर्ण ताकदीने करतात. याचा अनुभव अंबाजोगाईकरांनी ते शिक्षण सभापती असताना घेतलेला आहे. परंतु, महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्संनी आता अनुभव घेतलेला आहे. अत्यंत प्रभावी आणि नियोजनबद्धरित्या हा कार्यक्रम त्यांनी अंबाजोगाई येथे घडवून आणला व डॉक्टरांच्या सुप्त गुणांना हे सशक्त सांस्कृतिक कला मंच उपलब्ध करून दिले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक महाराष्ट्रभरातील डॉक्टर बांधव करीत आहेत आणि अंबाजोगाई चे नांव महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात पोहचविण्याचे काम डॉ.इंगोले यांनी केले आहे व ते आमचे सहकारी आहेत. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे असे गौरवोद्गार राजकिशोर मोदी यांनी यावेळी काढले.

उर्वरित पान २ वर

## परळीत देशपातळीवरील 'महापशुधन एक्स्पो 2026'

# पशुपालकांसाठी सुवर्णसंधी ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून 32 एकरात भव्य पशुपक्षी प्रदर्शन

परळी वैजनाथ :

प्रभू वैद्यनाथांच्या पावन भूमीत महाशिवरात्री २०२६ निमित्त देशपातळीवरील भव्य 'महापशुधन एक्स्पो २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून होणारा हा उपक्रम शेतकरी व पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन परळी वैजनाथ नगर परिषद शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीचे सभापती योगेश मेनकुदळे यांनी केले आहे.

दि. १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान परळीतील ओपळे मैदान, वैद्यनाथ कॉलेजसमोर, तब्बल ३२ एकर विस्तीर्ण परिसरात हा भव्य एक्स्पो भरविण्यात येणार आहे. देशभरातील १३०० हून अधिक उच्च दर्जाच्या पशुधन व विविध पक्षीप्रजाती या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या, घोडे, कुक्कुट तसेच दुर्मिळ पक्ष्यांच्या जाती पाहण्याची संधी या निमित्ताने उपलब्ध होणार आहे.

शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता या एक्स्पोचे उद्घाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. तर रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बक्षीस वितरणासह भव्य समारोप सोहळा पार पडणार आहे.

या एक्स्पोमध्ये पशुपालनातील आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित गोठा व्यवस्थापन, चारा लागवड पद्धती, पशुआरोग्य सेवा, तसेच शासनाच्या विविध योजनांचे थेट मार्गदर्शन दिले जाणार आहे. देशभरातील प्रगतशील पशुपालक, तज्ज्ञ आणि उद्योजक सहभागी होणार असल्याने हा कार्यक्रम केवळ प्रदर्शन न राहता ज्ञान, व्यवसाय आणि संधींचे मोठे व्यासपीठ ठरणार आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते समारोप; परळीच्या अर्थकारणाला चालना



### परळीला देशपातळीवरील हा मान मिळणे ही अभिमानाची बाब - योगेश मेनकुदळे

परळीला देशपातळीवरील हा मान मिळणे ही अभिमानाची बाब असून, हजारो शेतकरी व पशुपालकांच्या उपस्थितीमुळे स्थानिक बाजारपेठ, वाहतूक, निवास व्यवस्था आणि लघुउद्योगांनाही मोठी चालना मिळणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकरी व पशुपालकांनी या ऐतिहासिक महापशुधन एक्स्पो २०२६ मध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन सभापती योगेश मेनकुदळे यांनी केले आहे.







# चाटे स्कूल मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो... हनुमंत भोसले सर

## कमी कालावधीमध्येच चाटे स्कूलने गुणवत्तेच्या जोरावर चांगलीच भरारी घेतली

■ केज प्रतिनिधी

कै. यशवंतराव चाटे शिक्षण व तांत्रिक प्रशिक्षण संस्था तांबवा संचलित चाटे इंग्लिश स्कूल येथे शैक्षणिक वर्ष 2025 / 26 या वर्षामधील स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी या कार्यक्रमाला चाटे इंग्लिश स्कूलचे संस्थापक श्री शिवाजी चाटे सर केज नगरपंचायत च्या प्रथम नागरिक सीताताई बनसोड, डॉक्टर दिनकर राऊत अध्यक्ष आय एम ए, काझी जैनुल आबेदिन सइदोदिन, मा. क्षीरसागर डी बी, सुनील केंद्रे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती केज, वडवले एल बि इ. मा. बालकल्याण अधिकारी, दिपाली ताई चाटे, गोपीचंद सपाटे दादासाहेब कराड, रमाकांत बापू संस्थापक लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेज केज, लक्ष्मण बारगजे निरीक्षक इतर मागासवर्गीय कल्याण बीड, दत्तात्रेय चाटे, स्वप्निल उनवणे, ज्येष्ठ नेते किसन दादा कदम, हनुमंत सौदागर, श्री हनुमंत भोसले सर समाजसेवक कविता कराड मॅडम ॲड. मल्हारी आदाटे संभाजीनगर हायकोर्ट, दादासाहेब कराड संस्थापक संत ज्ञानेश्वर गुरुकुल केज, शिवाजी ठोंबरे जिल्हाध्यक्ष छवा संघटना बीड, दिनकर चाटे यांच्यासह माता पालक वर्ग व सर्व पत्रकार बांधव यांच्या उपस्थितीत सर्व बालकलाकारांनी विविध गाण्यावरती सादरीकरण करून सर्वांचे मन जिंकली...

कार्यक्रमाची सुरुवात व उद्घाटन केज नगरपंचायत च्या नगराध्यक्ष शिताताई बनसोड व हनुमंत भोसले सर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली याप्रसंगी सर्व मान्यवर उपस्थित होते शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या परंपरागत वंदनीय अभ्यासगतम सुस्वागतम या गीताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले यावेळी बोलताना हनुमंत भोसले सर उपस्थित विद्यार्थी व माता पालक वर्ग यांना संबोधित करताना स्नेहसंमेलना सारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो यामधूनच आदर्श कलाकार घडतात जीवनामध्ये कोणतीही गोष्ट अशक्य नसते परंतु ते मिळवण्यासाठी सदैव एक चांगली शाळा व शाळेमध्ये होणारे विविध कार्यक्रम यांच्या माध्यमातून होते. आपण सदैव कार्य मग्न असावे लागते सर्व विद्यार्थ्यांनी चाटे इंग्लिश स्कूल च्या माध्यमातून आपले ध्येय निश्चित करून नोकरी कलाक्षेत्र व्यावसायिक समाजशास्त्र अशा विविध क्षेत्रांमध्ये जाऊन नावलौकिक करावे असे आव्हान स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातून हनुमंत भोसले सर यांनी सांगितले तर अध्यक्षीय समारोपात सीताताई बनसोड यांनी या शाळेचे व सर्व विद्यार्थी शिक्षकांचे तसेच चाटे स्कूलचे संस्थापक शिवाजी चाटे सर यांचे कौतुक करून या शाळेमध्ये खरोखरच केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य देखील रुजवले जातात अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून आपल्या देशाची खरी संस्कृती जोपासली जाते सहभागी विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावरती भाग घेवून यामध्ये लोकगीत, शेतकरी गीत, कव्वाली, मराठमोळी गाणी, लावण्या, कोळीगीत, देशभक्तीपर गीत, अभंग, लोकनृत्य मराठमोळी लावणी, नृत्य सादर केली शाळेतील सर्व वर्गशिक्षक यांनी मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे कला सादर करता यावी यासाठी खूप प्रयत्न केले व विद्यार्थ्यांनीही उपस्थित सर्व माता पालक वर्ग यांना आपापल्या कला सादर करून आनंदी केले या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बडे मॅडम यांनी केले तर मान्यवर व पालकांचे चाटे स्कूलच्या वतीने आभार चाटे स्कूलचे संस्थापक शिवाजी चाटे सर यांनी केले.

# कांदा उत्पादक संकटात; निर्यात धोरण आणि वाढत्या आवकीमुळे दरात मोठी घसरण

■ संतोष सानप | आष्टी

आष्टी : मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रातील बाजार समित्यांमध्ये लाल कांद्याची आवक प्रचंड वाढली असून, त्या तुलनेत मागणी घटल्याने कांद्याचे दर ₹१,००० ते ₹१,४०० प्रति क्विंटल पर्यंत खाली आले आहेत. अनेक ठिकाणी तर कांद्याला प्रति किलो ५ ते ८ रुपये इतका अल्प दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे.

### निर्यात शुल्काचा अडथळा:

■ केंद्र सरकारने निर्यातबंदी उठवली असली, तरी सध्याचे कर आणि अटींमुळे भारतीय कांदा जागतिक स्पर्धेत महाग ठरत आहे. सरकारचे सध्याचे निर्यात धोरण काय आहे?

■ भारत सरकारचे कांदा निर्यात धोरण सध्या 'मुक्त' असले तरी त्यावर काही तांत्रिक मर्यादा आहेत:

* किमान निर्यात मूल्य (MEP):

■ सरकारने पूर्वी $५५० प्रति टन इतके किमान निर्यात मूल्य ठेवले होते, जे नंतर शिथिल करण्यात आले असले तरी जागतिक बाजारपेठेतील घसरलेल्या मितींमुळे भारतीय कांदा अजूनही स्पर्धात्मक ठरू शकलेला नाही.

### अचानक वाढलेली आवक:

■ अतिवृष्टी आणि लांबलेल्या पावसामुळे यंदा खरीप आणि लेट खरीप कांद्याची लागवड उशिरा झाली होती. आता हा सर्व कांदा एकाच वेळी बाजारात आल्याने 'पुरवठा जास्त आणि मागणी कमी' अशी स्थिती निर्माण झाली आहे.

### आंतरराष्ट्रीय स्पर्धा:

■ जागतिक बाजारपेठेत, विशेषतः आखाती देशांमध्ये चीन आणि पाकिस्तानचा कांदा भारतापेक्षा स्वस्त दरात उपलब्ध आहे. यामुळे भारतीय कांद्याची मागणी थंडावली आहे.

### बांगलादेशचे धोरण

■ भारताचा प्रमुख आयातदार देश असलेल्या बांगलादेशने स्वतःच्या देशातील शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आयातीवर काही निर्बंध आणले आहेत, तसेच तिथे स्थानिक उत्पादनही उपलब्ध असल्याने भारतीय निर्यातीला खिळ बसली आहे.


**निर्यात शुल्क:** केंद्र सरकारने यापूर्वी असलेले ४०% निर्यात शुल्क २०% पर्यंत खाली आणले होते, जेणेकरून निर्यात वाढावी. मात्र, सद्यस्थितीत हे शुल्कही शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना जास्त वाटत आहे.

**धोरणात्मक अनिश्चितता:** व्यापाऱ्यांच्या मते, सरकारच्या धरसोड वृत्तीच्या धोरणामुळे (कधी निर्यातबंदी तर कधी निर्यात शुल्क) आंतरराष्ट्रीय खरेदीदारांचा भारतीय बाजारपेठेवरचा विश्वास कमी झाला आहे.

**बाजार समितीमधील सध्याची स्थिती (अंदाजे दर)**

| बाजार समिती | सरासरी दर (प्रति क्विंटल) | स्थिती |
| --- | --- | --- |

# सृष्टीचे पालनहार "देवादी देव महादेव"




भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व सर्वांचेच तारणहार दैवत आहे.असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये ३३ कोटी देवी-देवतांचा वास आहे.परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच "शिव-पार्वती" आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचविले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो. म्हणजेच आकार -पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे दर्शन अवश्य होते.त्यामुळेच हिंदु मान्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते.भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव-देव -दानव-किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे.त्यामुळे आजही नागव्दार,महादेव,पचमडी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुद्धा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून शंकरजी प्रसन्न होऊन त्यांना बलशाली होण्याचे वर्दानसुध्दा दीले होते.त्यामुळे शंकरजीची पुजा करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे.कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे.याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे. आज स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते. आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो,खेळतो,बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवी-देवतांचा वासच आहे. कोणतीही देवी-देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या ह्रदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते नवीन ऊर्जा निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे.आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले,फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे. परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे. आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल. महाशिवरात्री हा हिंदू धर्माचा पवित्र सन आहे.त्यामुळे महाशिवरात्री हा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते. महाशिवरात्रीला बेलपत्ती,गोंगलाचे फुले, आंब्याचे पाणीखायचे पान याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते.महादेवाचे गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी ५ महाराष्ट्रात आहे.त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे. या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत.यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था आहे.त्याच प्रमाणे ॐ नमः शिवाय ,ॐ शांती,हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते,शांती मिळते, आरोग्याच्या



दृष्टीकोणातु ओम नमो शिवाय हा जप महत्वपूर्ण मानल्या जातो यामुळे अनेक आजार दुर होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे.शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना "हर हर महादेव"चा जयघोष करीत असे.यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती. त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा "हर हर महादेव "चा जयघोष ऐकायला मिळतो. यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते.याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे.महाशिवरात्रीच्या सणाला लहान -मोठे, आबालवृद्धा सारखे संपूर्ण भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विग्न टळुदे व सुख-शांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी.महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल,जल,वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे.कारण बदलते हवामान व यामुळे वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने,हिमकडा कोसळुन महाप्रलय येणे, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती उष्णता,अती थंडी,भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे.अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते. यालाही नाकारता येणार नाही. याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे.आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील.यात दुमत नाही.देशात महाप्रलय, भुकंप, अती उष्णता,अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे व हवामानातील बदल या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारामुळे दिसून येते.देवादी देव महादेवाचा वास दऱ्या-खोऱ्यात, पहाडात, जंगलात, निसर्गानच्या सान्निध्यातील काणा -कोपऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो. त्यामुळे महाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे.महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.

■ **लेखक** रमेश कृष्णराव लांजेवार ( स्वतंत्र पत्रकार )

पान १ वरुन

# अंबाजोगाईत कला दर्पण महोत्सव जल्लोषात साजरा

माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र कुंटे यांनी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांच्यातील अष्टपैलू व्यक्तिमत्व पाहून माझ्या काळात सर्वप्रथम मी त्यांना सांस्कृतिक समितीचा राज्याध्यक्ष म्हणून नियुक्ती दिली. त्याच वर्षी त्यांनी चिपळूण येथे अत्यंत दर्जेदार व बहारदार असा सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणला त्याच वेळी आम्हाला कळलं की, या पदासाठी आम्ही योग्य व्यक्ती योग्य वेळी निवडला आहे आणि आज आपण त्याचे फलित पाहत आहोत. की, महाराष्ट्र मधून डॉक्टर्स या इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक स्पर्धांची वाट पाहत आहेत आणि प्रचंड संख्येने यामध्ये सहभागी होत आहेत मला वाटतं एखादा माणूस एखाद्या पदाला वलय कसं प्राप्त करून देतो व त्या पदाचा उपयोग त्या संघटनेत काम करीत असणाऱ्या माणसांसाठी कसा करून देतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे आहेत. यावेळी बोलताना महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांनी गेल्या तीन वर्षांपासून डॉ.राजेश इंगोले हे सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत आणि या तिन्ही वर्षांमध्ये त्यांचा उत्साह कमी झाला नाही. डॉ.राजेश इंगोले हे प्रेरणादायी व्यक्तिमत्व आहेत. ते ज्या पदावर काम करतात त्या पदाला एक वेगळे महत्त्व प्राप्त करून देतात. याची प्रचिती त्यांनी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वेगवेगळ्या पदांवर काम करताना दाखवून दिली आहे. एखाद्या व्यक्ती एखाद्या पदाला किती मोठे करू शकतो याचे उदाहरण म्हणजे डॉ.राजेश इंगोले आहेत. त्यांच्या कार्यकाळांमध्ये दवाखाने आणि रूग्ण यामध्ये व्यस्त असलेला डॉक्टर आणि या डॉक्टर मधील कलाकार शोधून काढण्याचे काम त्यांनी केलं आहे. महाराष्ट्रभरातील डॉक्टरांना त्यांनी एक मजबूत असं सांस्कृतिक कला मंच उपलब्ध करून दिला आणि ज्या सांस्कृतिक समितीवर काम करायला कोणी तयार नसायचं त्या सांस्कृतिक समितीला यशाच्या शिखरावर नेण्याचे काम डॉ.इंगोले यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये करून दाखवला आहे. या अशा हरहुन्नरी आणि उद्या नेतृत्वाची संघटनेला भविष्यामध्ये ही गरज आहे. आणि त्यांच्या या कार्याच्या पाठीशी आम्ही त्यांचे सहकारी म्हणून राज्य पदाधिकारी म्हणून कायम उभे असतो याची ग्वाही त्यांनी दिली. अंबाजोगाई येथील इंडियन मेडिकल असोसिएशनचा हा राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ अत्यंत दर्जेदार होत आहे व त्याला आता व्यापक स्वरूप आलेले आहे. नाशिक, मुंबई, ठाणे, नागपूर, भंडारा, गोंदिया, डहाणू, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, अहिल्यानगर, परभणी, नांदेड, धुळे, वर्धा या ठिकाणाहून हे विजेते स्पर्धक डॉक्टर्स या ठिकाणी आले आहेत आणि या सांस्कृतिक पारितोषिक वितरण समारंभाचे हे मिळालेले प्रचंड मोठे यश आहे असे मी मानतो आणि त्याचे सर्व श्रेय समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले व त्यांच्या टीमला जातं या शब्दांत त्यांनी डॉ.इंगोले यांची प्रशंसा केली. आपल्या अध्यक्षीय समारोपपर भाषणात बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, मी कोणत्याच पदाला छोटं किंवा मोठं मानत नाही. ते पद स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम मी त्या पदाद्वारे संघटनेसाठी काय करता येईल या गोष्टींचा प्राधान्याने विचार करतो. त्यानंतर त्या पदाचा उपयोग करून सर्वसामान्यांसाठी विविध कार्यक्रम प्रोजेक्ट व नवीन संकल्पना तयार करतो. त्यासाठी लागणारी टीम मी उभी करतो. त्या टीम मधील विविध पैलू असलेले सदस्य कशा पद्धतीने त्या प्रोजेक्टसाठी दर्जेदार काम करू शकतील याचा विचार करतो आणि मग प्रत्येकाला त्याची योग्य ती जबाबदारी वाटून देतो. त्यामुळे ते पद अल्पवधीतच नांवारूपाला येतं. सांस्कृतिक समितीचे अध्यक्षपद स्वीकारत असताना ही ते पद कोणीच घेत नाही. याची मला पुर्वकल्पना होती. परंतु, मी ते पद स्वीकारलं. माझ्या सहकाऱ्यांच्या साह्याने विविध कार्यक्रम आयोजित केले आणि दरवर्षी त्याला उत्तरोत्तर माझ्या डॉक्टर्स कलाकार मंडळींचा उत्स्फूर्त प्रतिसाद ही मिळत गेला. डॉक्टरांत दडलेला कलाकार माझ्या या कामामुळे बाहेर आला याचे मला अधिक समाधान आहे. आयुष्य जगत असताना पैसा हे ध्येय असावं. कारण, ते जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. परंतु, त्या जीवनामध्ये आनंद समाधान आणि त्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी ते जीवन जगताही आलं पाहिजे आणि जीवन जगण्यासाठी आपल्या अंगात असणाऱ्या सुप्त गुणांना कलागुणांना वेळोवेळी प्रदर्शित करता आलं पाहिजे, प्रकट करता आलं पाहिजे आणि आपलं जीवन समृद्ध करता आलं पाहिजे. अनेक जणांनी प्रतिक्रिया व्यक्त करीत असताना डॉ.राजेश इंगोले यांनी अत्यंत मोलाचं काम केलं आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. परंतु, हे यश इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समितीचा राज्याध्यक्ष म्हणून जरी मला मिळत असलं तरी त्यामागे मागील तीन वर्षांपासून माझ्यासोबत खंबीरपणाने असणाऱ्या राज्य समिती सदस्य डॉ.पल्लवी दोडके, डॉ.मोहिनी गानू, डॉ.गितांजली शर्मा, डॉ.तुकाराम मुंढे, डॉ.राजश्री सावंत, डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.योगेश मुळे, डॉ.श्रुती जाधव, डॉ.विनोद शेलार, डॉ.प्रफुल्ल जटाळे, डॉ.अमोल गित्ते तसेच स्थानिक शाखेचे डॉ.विजय लाड डॉ.उद्धव शिंदे, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.नितीन पोतदार, डॉ.दीपक कटारे, डॉ.निलेश तोष्णीवाल, डॉ.मनिषा पवार, डॉ.अरूणा केंद्रे, डॉ.स्वप्नाली सुवर्णकार, डॉ.सारिका शिंदे, डॉ.प्रल्हाद गुरव, डॉ.शाहिद शेख, डॉ.इम्रान पटेल, डॉ.स्नेहल होळंबे डॉ.संगीता चव्हाण, डॉ.दिनकर राऊत, डॉ.जिगीशा मारवाळ, डॉ.विवेक मुळे, डॉ.अमोल दहिफळे यांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला अशी कृतज्ञता डॉ.इंगोले यांनी आपल्या सहकाऱ्यांप्रती व्यक्त केली. यावेळी अधिष्ठाता डॉ.अरविंद बगाटे, विभागप्रमुख डॉ.ज्ञानोबा दराडे, उपाध्यक्ष डॉ.पल्लवी दोडके यांनी आपले समायोचित विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका प्रा.सुरेखा सिरसाट खंडाळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.अरूणा केंद्रे यांनी मानले. या कार्यक्रमास नगरपरिषद गटनेते ताहेरभाई सय्यद, सभापती नजीरभाई पठाण, नगरसेवक राजपाल जावळेंसह इतर नगरसेवक, पत्रकार, रोट्रॅक्ट क्लबच्या रोहिणी पाठक, महात्मा फुले स्मारक समिती सदस्य, इनरव्हिल क्लब, रोट्रॅक्ट क्लबचे सदस्य, सर्व डॉक्टर्स व अंबाजोगाईतील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# ‘तेलाचा करार’: भारतीय कंपन्यांकडून व्हेनेझुएलाचे तेल खरेदी ट्रम्पच्या ताब्यानंतरची सर्वात मोठी डील

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमेरिकेच्या राजकीय आणि व्यापारी धोरणांमध्ये झालेल्या बदलानंतर भारतीय तेल कंपन्यांनी व्हेनेझुएलाचे कच्चे तेल खरेदी करण्याचा ऐतिहासिक करार केला आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (IOCL) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन (HPCL) यांनी संयुक्तपणे २,००,००० बॅरल (20 लाख बॅरल) व्हेनेझुएलाचे मेरिये क्रूड तेल ट्रॅफिगुरा या कमोडिटी व्यापाऱ्याकडून एप्रिल २०२६ मध्ये डिलीव्हरीसाठी घेतले आहे. यापैकी IOCL सुमारे 1.5 दशलक्ष बॅरल घेत आहे आणि HPCL सुमारे 5,00,000 बॅरल उचलणार आहे. हे एक विशाल क्रूड कॅरियर (VLCC) मध्ये भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पोहोचणार आहे. हे करार HPCL साठी व्हेनेझुएलाचे तेल खरेदी करण्याचा पहिला व्यवहार आहे, तर IOCL याने यापूर्वीही हे तेल २०२४ मध्ये आयात केले होते.



## व्यापार धोरणात बदल: विविधतेकडे वळणे

- भारतीय रिफायनरीज मोठ्या प्रमाणावर त्यांच्या कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात विविधता आणण्याचा प्रयत्न करत आहेत. रशियन कच्च्यावरील अवलंबित्व कमी करणे आणि पश्चिमेकडील देशांसोबत व्यापार सुलभ करणे यासाठी ही वेळ योग्य मानली जात आहे.

## या एकात्मिक खरेदीमुळे:

- भारतीय कंपन्यांची ऊर्जा सुरक्षा आणि विविधता सुदृढ होते.
- रशियन कच्च्या तेलावर अवलंबित्व कमी होण्याची शक्यता वाढली आहे.
- अमेरिकेसह चालू असलेल्या व्यापार करारांसाठी भारताची भूमिका अधिक सकारात्मक दिसू लागली आहे.

## ट्रम्प प्रशासनाचा बंदरगाह धोरण

- अमेरिकेने व्हेनेझुएलावर नियंत्रण मिळवल्यानंतर, व्हिटोल आणि ट्रॅफिगुरा यांना खास U.S. परवानग्या दिल्या आहेत ज्यामुळे ते व्हेनेझुएलाचे तेल जागतिक बाजारात विकू शकतात. या परवान्यांमुळे व्हेनेझुएलाचे तेल पुन्हा जागतिक पुरवठा साखळीत प्रवेश करत आहे आणि भारतासारख्या खरेदीदारांना ऑफर केले जात आहे.

## आयात धोरण, व्यापारी कारक आणि किमती

- नीलामीमध्ये मिळालेल्या माहितीनुसार, या तेलाचे किमती डुबई बेंचमार्कवर आधारित ठेवण्यात आल्या आहेत, जे ICE ब्रेंटच्या तुलनेत सुमारे $6.50 ते $7 प्रति बॅरल सवलतीवर मिळाले आहेत — हे रिलायन्स इंडस्ट्रीजच्या खरेदी निकषांसारखेच आहेत. यातील माल IOCL, HPCL आणि रिलायन्स सारख्या मुख्य रिफायनिंग कंपन्यांसाठी कच्च्या तेलाच्या प्रकारात भारी क्रूड प्रक्रिया करण्यासाठी योग्य आहे आणि त्यामुळे त्यांचे refining economics सुद्धा सुधारण्यास मदत होणार आहे.

## भारत-युएस व्यापार आणि भू-राजकीय परिणाम

- भारत-अमेरिका व्यापारी कराराच्या चौकटीत अजूनही चर्चा सुरू असून भारताने रशियन तेल खरेदीसंबंधी निश्चित निर्णय घेतलेला नाही, परंतु विविधतेचा ट्रेंड वृद्धिंगत झाला आहे. Financial Times ट्रम्प प्रशासनाने भारतावर कडक विरोधाभासी धोरणे लागू केली होती ज्यात रशियन तेलावर टॅरिफ लावण्याचा समावेश होता; पुढे त्यात बदल होत आहेत. हे करार ऊर्जा बाजारात भारताची स्थिती सक्षम आणि सौदेबाजार-आधारित बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## या २० लाख बॅरलच्या व्हेनेझुएलाच्या तेलाच्या करारामुळे:

- भारताच्या कच्च्या तेलाच्या इंपोर्ट पोर्टफोलिओमध्ये लक्षणीय बदल दिसून येतो. अद्यापही रशियन तेलावर पूर्णपणे निर्भरता कमी झालेली नाही, परंतु विविधतेकडे दिशा बदलल्याचे स्पष्ट होते. व्यापार धोरणाच्या चालू बदलांमुळे भारत-युएस संबंध अधिक जवळ साधण्यास मदत होण्याची शक्यता आहे.

# राजनाथ सिंह आणि ग्रीसच्या संरक्षण मंत्र्यांची दिल्लीमध्ये उच्चस्तरीय चर्चा : धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत

**नवी दिल्ली वृत्तसंस्था**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्लीमध्ये हेल्लेनिक प्रजासत्ताकाचे संरक्षण मंत्री निकोलाओस-जॉर्जिओस डेन्डियास यांच्याबरोबर द्विपक्षीय महत्त्वाची बैठक आयोजित केली. भारत आणि ग्रीस या दोन्ही देशांचे संरक्षण आणि धोरणात्मक संबंध अधिक प्रगल्भ करण्यावर दोन्ही मंत्र्यांनी जोर दिला. दोन्ही नेत्यांनी भारत-ग्रीस रणनीतिक भागीदारी द्वipक्षीय शांतता, स्थैर्य, स्वातंत्र्य आणि परस्पर सन्मान या समान मूल्यांवर आधारित असल्याचे अधोरेखित केले. बैठकीत दोन देशांमधील संरक्षण सहभागी धोरणाची पुढील दिशा नियोजित करण्यात आली.




### संरक्षण उद्योग सहकार्याला नवसंजीवनी

भारताच्या आत्मनिर्भर भारत उपक्रमाला पूरक ठरून आणि ग्रीसच्या एजेंडा 2030 अंतर्गत संरक्षण सुधारणा धोरणाला प्रतिसाद देत, दोन्ही देशांनी संरक्षण उद्योगक्षेत्रातील क्षमता वाढविण्याचा निर्णय घेतला. याचा उद्देश्य: परस्पर संरक्षण उद्योगासाठी संशोधन, विकास आणि उत्पादन क्षेत्रांमध्ये भागीदारी वाढवणे मेक इन इंडिया आणि ग्रीसचे सुधारित औद्योगिक घटक एकत्र सशक्त करणे या भागीदारीचा पाया मजबूत करण्यासाठी संयुक्त आशय पत्रावर (Letter of Intent) स्वाक्षरी करण्यात आली असून त्याद्वारे पुढील पाच वर्षांसाठी कृती आराखडा तयार करण्यास काम सुरु झाले आहे.

### प्रादेशिक शांतता आणि सुरक्षा: सामूहिक दृष्टीकोन

राजनाथ सिंह आणि डेन्डियास यांनी प्रादेशिक शांतता, स्थिरता आणि सुरक्षेविषयी विविध महत्त्वाचे मुद्दे गंभीरपणे चर्चिले. बस्स यावेळी दोन्ही देशांच्या धोरणात्मक संवादाची गती अधिक वाढल्याचे स्पष्ट दिसून आले. दोन्ही पक्षांनी २०२६ साठी द्विपक्षीय लष्करी सहकार्य आराखडा देवाणघेवाण केला, ज्यामध्ये: दोन्ही देशांच्या सशस्त्र दलांमध्ये लष्करी उपक्रमांची दिशा आणि प्राथमिकता निश्चित भविष्यातील संयुक्त लष्करी सराव आणि प्रशिक्षण कार्यक्रमांना चालना

### संरक्षण तसेच सामरिक संवादाला सशक्त आधार सागरी सामरिक सहकार्य आणि माहिती विनिमय

प्राचीन समुद्रपरंपरा असलेल्या भारत आणि ग्रीस यांनी सागरी सुरक्षा आणि सामरिक सहकार्यातही अतिशय सकारात्मक भूमिका घेतली आहे. याच बैठकीत घोषणा करण्यात आली की गुरुग्राम येथील Information Fusion Centre – Indian Ocean Region (IFC-IOR) मध्ये ग्रीसचे आंतरराष्ट्रीय संपर्क अधिकारी नेमण्यात येणार आहेत, ज्यामुळे माहिती विनिमय आणि सामरिक निर्णय प्रक्रियेत अधिक गतिशीलता येईल.

### औद्योगिक भेटी आणि संवाद

बैठकीच्या निमित्ताने हेल्लेनिक शिष्टमंडळाने बेंगळुरू येथील काही महत्त्वाच्या संरक्षण आणि औद्योगिक संस्थांना भेट देऊन अभ्यास केला. यामध्ये:
विविध डिफेन्स PSU (संरक्षण उत्पादक कंपन्या)
नवीन तंत्रज्ञान आधारित स्टार्ट-अप प्रतिनिधी
संरक्षण उद्योग क्षेत्रातील उच्चाधिकारी
हे सगळे प्रतिनिधींसोबत संवाद साधला गेला आणि संयुक्त संशोधन, उत्पादन व नवकल्पना कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्व पटवून दिले गेले.
ही बैठक भारत-ग्रीस या दुहेरी धोरणात्मक भागीदारीस नवीन उभार देणारी ठरली आहे. लष्करी, सामरिक व औद्योगिक सहकार्याच्या विस्तृत संकल्पनेवर आधारित ही चर्चा दोन्ही देशांच्या राष्ट्रीय हिताला पूरक बनण्याची शक्यता बळकट करते. भविष्यातील संरक्षण सहयोग, तांत्रिक संवाद आणि सामरिक निष्पादन क्षमता वाढविण्याच्या दिशेने आजचा हा टप्पा महत्त्वाचा मानला जात आहे.

# अमरावतीचे ऋण फेडण्यासाठी शिवजयंतीनिमित्त व्याख्याने देण्यासाठी अमरावतीला आलो आहे

## डॉ.प्रवीणकुमार शेंडे यांचे अमरावतीत आगमन

येत्या शिवजयंतीनिमित्त नागपूर आणि अमरावती विभागात वेगवेगळ्या ठिकाणी व्याख्याने देण्यासाठी मिशन आयएएस अमरावती या संस्थेने पुण्याचे सुप्रसिद्ध वक्ते व संमोहन तज्ञ डॉ. प्रवीण कुमार शेंडे यांना निमंत्रित केले आहे. आज अमरावती येथे त्यांचे शिवजयंतीच्या कार्यक्रमासाठी आगमन झाले .त्याप्रसंगी मिशन आयएएस व सार्वजनिक वाचनालय नांदगाव पेठतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. प्रवीणकुमार शेंडे हे 28 फेब्रुवारी पर्यंत वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये तालुक्यामध्ये शिवजयंती निमित्त मिशन आय ए एस ने आयोजित आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांना नागरिकांना पालकांना मार्गदर्शन करणार आहेत.

आज नांदगाव पेठ येथील सार्वजनिक वाचनालयमध्ये त्यांचा सत्कार झाला .त्याप्रसंगी त्यांनी मी अमरावतीचा सुपुत्र आहे .आज जरी मी वक्ता म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात परिचित असलो तरी माझी पाळे मुळे ही अमरावतीची आहेत. त्यासाठी मी शिवजयंतीनिमित्त वीस दिवस व्याख्याने देण्यासाठी अमरावतीला आलो आहे. मातृऋण फेडण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न आहे असे उद्गार त्यांनी याप्रसंगी काढले. नांदगाव पेठ येथील सार्वजनिक वाचनालयात संपन्न झालेल्या या सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिशन आय ए एस.चे संचालक प्रा. डॉ

नरेशचंद्र काठोळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माझी माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयप्रकाश खडसे हे होते. याप्रसंगी सार्वजनिक वाचनालयाचे सचिव श्री राजन देशमुख यांनी प्रास्ताविक केले. तर श्री राजन देशमुख यांनी शाल व छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची प्रतिमा देऊन डॉ.शेंडे यांचा सत्कार केला. डॉ प्रवीणकुमार शेंडे हे शिवजयंतीनिमित्त दहा ते 28 फेब्रुवारीपर्यंत अमरावती व नागपूर विभागात विविध ठिकाणी व्याख्याने देणार आहेत. मिशन आयएएसने या व्याख्यानाचे संपूर्ण आयोजन केले आहे .याप्रसंगी पत्रकार श्री दिनकर सुंदरकर डॉ. प्राप्तिका कापडे गोपाल देशपांडे हे विचार पिठावर उपस्थित होते.

आपल्या व्याख्यानानंतर डॉ. प्रवीणकुमार शेंडे यांनी विद्यार्थ्यांसमोर मेमरी टेक्निकचे काही प्रात्यक्षिक करून दाखविले. कार्यक्रमाची सांगता मिशन आय ए एसचे जनसंपर्क अधिकारी श्री चंद्रशेखर आसोले यांच्या आभाराने झाली. या कार्यक्रमाला सार्वजनिक वाचनालयाचे सदस्य तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते

ज्यांना डॉ. प्रवीणकुमार शेंडे यांची व्याख्याने त्यांच्या संस्थेत आयोजित करावयाची आहेत त्यांनी अधिक माहितीसाठी व त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यासाठी मिशन आय ए एस.चे संचालक प्रा डॉ. नरेशचंद्र काठोळे यांच्याशी 9890967003 या क्रमांकावर संपर्क साधावा. विशेष म्हणजे डॉ. प्रवीणकुमार शेंडे हे मानधन घेणार नसून शिवजयंतीनिमित्त ठिकठिकाणी विना मानधन व्याख्याने देणार आहेत. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

**प्रकाशनार्थ राजन देशमुख**
**सचिव सार्वजनिक वाचनालय**
**नांदगाव पेठ जिल्हा अमरावती**



# अस्वलंबा गावाच्या मातीत वाढलेली, माणुसकीची ओल जपणारी दोन नावे आज गावागावात आदराने घेतली जातात

**श्रीकृष्ण पांडुरंग ढाकणे आणि गोविंद पांडुरंग ढाकणे. उद्योग क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करतानाच समाजाशी नाळ घट्ट जोडून ठेवणारे हे दोघे भाऊ सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण ठरत आहेत.**



आपल्या स्वर्गीय वडील पांडुरंग ढाकणे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांनी सुरू केलेला उपक्रम आज अस्वलंबा गावासाठी अभिमानाची गोष्ट बनला आहे. गावातील प्रत्येक मुलीच्या विवाहप्रसंगी ₹११,०००/- चा धनादेश देऊन हे दोघे भाऊ केवळ आर्थिक मदत करत नाहीत, तर त्या कुटुंबाच्या आनंदात आपुलकीने सहभागी होतात. लग्नासारख्या महत्त्वाच्या प्रसंगी मदतीला धावून जाणे, ही त्यांच्या दानशूर वृत्तीची खरी ओळख आहे.

हा उपक्रम कुठलाही गाजावाजा न करता, शांतपणे आणि सातत्याने सुरू आहे. म्हणूनच गावकरी त्यांना फक्त उद्योगपती म्हणून नव्हे, तर मदतीला धावून येणारे माणूस, दानशूर व्यक्तिमत्त्व, आणि धर्मवीर बंधू म्हणून ओळखतात. समाजातील मुलींच्या पाठीशी उभे राहून त्यांनी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

आजच्या काळात स्वतःपुरते जगण्याची प्रवृत्ती वाढत असताना, श्रीकृष्ण आणि गोविंद ढाकणे यांचे कार्य समाजात आशेचा किरण निर्माण करते. त्यांच्या या उपक्रमामुळे अस्वलंबा गावात सामाजिक ऐक्य, आपुलकी आणि सहकार्याची भावना अधिक दृढ होत आहे.

खऱ्या अर्थाने वडिलांच्या स्मृतीला समाजसेवेच्या माध्यमातून जपणारे, माणुसकीची परंपरा पुढे नेणारे श्रीकृष्ण पांडुरंग ढाकणे आणि गोविंद पांडुरंग ढाकणे हे नाव आज अस्वलंबा गावाच्या अभिमानाचे प्रतीक बनले आहे. त्यांच्या या कार्यातून अनेकांनी प्रेरणा घेऊन समाजासाठी पुढे यावे, हीच अपेक्षा.

# परळी थर्मल अंतर्गत अनियमितता, पर्यावरणीय उल्लंघन, आणि थर्मल बाबतचे आदेश - अर्थकारणावर होणार परिणाम!

**परळी थर्मलला दोन संच तात्काळ बंद करण्याचे आदेश**

**पर्यावरण नियम धाब्यावर; परळी थर्मलचे संच क्रमांक 6 आणि 8 बंद**

**CPCB कडून कडक कारवाई — परळी थर्मलवरील पर्यावरण मंजुरी धोक्यात**

**सूचना देऊनही सुधारणा नाही; परळी थर्मलवर प्रदूषण मंडळाची कठोर भूमिका**

**पर्यावरणीय उल्लंघन महागात; परळीच्या अर्थकारणावर बसणार फटका**

वृत्तसंस्था -

पर्यावरण नियमांचे सातत्याने उल्लंघन होत असल्याचा ठपका ठेवत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) परळी येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रावर मोठी कारवाई केली आहे. थर्मलमधील संच क्रमांक ६ आणि ८ तातडीने बंद करण्याचे निर्देश CPCB ने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला दिले आहेत. तसेच या प्रकल्पाला देण्यात आलेली पर्यावरण मंजुरी रद्द करण्याची प्रक्रियाही सुरू करण्याचे संकेत देण्यात आल्याने परळी परिसरात खळबळ उडाली आहे.

परळी थर्मल प्रकल्प आधीच अडचणीत सापडलेला असताना ही कारवाई अधिकच धक्कादायक मानली जात आहे. मागील काही वर्षांत इंधन टंचाई, विजेची मागणी कमी असणे, तांत्रिक अडचणी यामुळे अनेक संच वारंवार बंद ठेवावे लागले आहेत. आता पर्यावरणीय नियमभंगामुळे दोन महत्त्वाचे संच बंद करण्याचे आदेश मिळाल्याने प्रकल्पाच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### आधीच दिले होते आदेश, तरीही सुरूच होते संच

मिळालेल्या माहितीनुसार, संच क्रमांक ६ आणि ८ बंद करण्याचे निर्देश CPCB ने यापूर्वीच दिले होते. मात्र त्या आदेशांची अंमलबजावणी न झाल्याचे निरीक्षणात आले. मे २०२५ मध्ये झालेल्या पाहणीदरम्यान बंद ठेवण्याचे निर्देश असतानाही हे दोन्ही संच कार्यरत असल्याचे आढळले. या गंभीर प्रकाराची दखल घेत केंद्रीय मंडळाने आता तातडीने संच बंद करून अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

### अर्थकारणावर होणार परिणाम-

परळी थर्मल हा स्थानिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार मानला जातो. हजारो कुटुंबांचे रोजगार, वाहतूक, कंत्राटी कामे आणि स्थानिक व्यवसाय या प्रकल्पाशी जोडलेले आहेत. त्यामुळे दोन संच बंद पडल्यास वीज निर्मिती घटण्याबरोबरच स्थानिक आर्थिक हालचालींवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### केंद्रीय मंडळाने नोंदवलेल्या प्रमुख अनियमितता

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात खालील गंभीर बाबींवर ठपका ठेवण्यात आला आहे:

### प्रदूषण नियंत्रणासाठी उभारलेली यंत्रणा अपुरी आणि अप्रभावी

- **राख (Fly Ash) व्यवस्थापनात गंभीर त्रुटी**
- **प्रक्रियाविना दूषित पाणी सोडल्याचे निरीक्षण**
- **राख साठवण आणि वापरासंदर्भात पर्यावरणीय मार्गदर्शक तत्वांचे पालन नाही.**
- **हवेतील प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक प्रणालींचे अपूर्ण कार्यान्वयन.**
- **निरीक्षण व अहवाल सादरीकरणात अनियमितता**
- **पर्यावरण मंजुरीतील अटींचे वारंवार उल्लंघन**
- **सुरक्षित विल्हेवाट प्रणाली नसताना उत्सर्जन वाढल्याचे निदर्शनास**
- **नियंत्रण यंत्रणांच्या देखभालीकडे दुर्लक्ष**



# महिला महाविद्यालयाची प्रणव पॅथॉलॉजी केंद्राला अभ्यास भेट

परळी | वार्ताहर

येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय हे विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच कटिबद्ध असते . त्यांचा विकास व्हावा म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी अभ्यास सहलीचे आयोजन या महाविद्यालयातील विविध विभाग करीत असतात .

त्याचाच एक भाग म्हणून महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे मॅ यांच्या मार्गर्शनात प्राणिशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनीची दि ९ फेब्रु २०२६ रोजी परळी येथील प्रणव पॅथॉलॉजी सेंटरला भेट सहल आयोजित करण्यात आली .

या भेटीचा मुख्य उद्देश प्रयोगशाळेच्या कार्यपद्धतीची प्रत्यक्ष माहिती मिळवणे हा होता .या भेटीदरम्यान रक्ताचे नमुने, संकलन,



व तपासणी प्रक्रिया पाहण्यात आली . लॅब चे संचालक मा. बर्दापुरे सर यांनी विद्यार्थ्यींनींना रक्तगट तपासणी,हिमोग्लोबिन मोजमाप, शुगर, एचबीएवनसी, एचआयव्ही व इतर मूलभूत चाचणीची विस्तृत माहिती विद्यार्थिनीना दिली.

प्रयोगशाळेतील आधुनिक उपकरणाचे कार्य त्यांनी प्रात्यक्षिकाद्वारे स्पष्ट केले . यावेळी विद्यार्थिनींनी रक्त तपासणी संदर्भात उत्सुकतेने विचारले . ही भेट प्राणीशास्त्रातील विद्यार्थिनींसाठी अत्यंत उपयुक्त व ज्ञानवर्धक ठरली. या प्रयोगशाळा भेटीसाठी प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विद्या गुळभिले,प्रा.शरद रोडे डॉ एल एस मुंडे व सहायक अनिल कट्टे यांच्यासह सर्व बीएस्सीच्या विद्यार्थीनींची उपस्थिती होत्या .

या प्राणिशास्त्र विभागाच्या उपक्रमाचे संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी भरभरून कौतुक केले .

# राज्यसरकारी कर्मचाऱ्यांना 3 टक्के वाढीव महागाई भत्ता लागू त्वरित लागू करावा - मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

परळी / प्रतिनिधी

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना दि.१ जुलै २०२५ पासून लागू झालेला ३ टक्के वाढीव महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षक-प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचारी यांना त्वरित लागू करावा असी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री व संबंधीतांकडे केली आसल्याची माहिती मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी दिली आहे.

याबाबत अघाव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, बाजारात होत असलेली प्रचंड महागाई वाढ लक्षात घेऊन केंद्र शासनाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना दि.१ जुलै २०२५ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे. त्यांच्या महागाई भत्ता ५५ टक्क्यावरुन ५८ टक्क्यांवर गेला आहे. तर राज्यातील कर्मचारी व शिक्षकांना अद्याप ५५ टक्केच महागाई भत्ता मिळत आहे. केंद्राने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करून आज जवळपास सात महिने झाले आहेत. तरी राज्यशासनाकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात वाढ करण्याची हालचाल दिसून येत नाही. केंद्रा प्रमाणे वेतन व भत्ते देण्याचे राज्यसरकारचे सुत्र आसून केंद्राने



त्यांच्या कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते लागू केले की राज्य सुध्दा त्यांच्या कर्मचाऱ्यांना दोन महिन्याच्या आत त्याची अंमलबजावणी करत असते. परंतू सदरील ३ टक्के वाढीव महागाई भत्ता सात महिने होऊन गेले तरी तो अद्याप पर्यंत लागू केला गेला नाही. म्हणून कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होत आहे.तरी राज्यसरकारने या मागणीची तात्काळ दखल घेऊन राज्यातील राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षक-प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचारी यांना ३ टक्के वाढीव महागाई भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने १ जुलै २०२५ पासून लागू करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संबंधीतांकडे प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. मागणी पत्रकावर मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे, व्ही. जी.पवार, अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, गुट्टे एस.जी. कोषाध्यक्ष औताडे ए.बी.,सहसचिव पवार टी.जी.,माळी एन.जी.,श्रीमती रेखा साळुंखे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव, अशोक मस्कले, मधुकर जोंधळे, रातोळे जी.जी.,कुरेशी ए.ए.,राठोड पी.आर.,सुर्यवंशी आर.एन.,कदम व्ही.जी.,कौशल्य जी.पी.,पाटोदेकर ए.डी.,सोळंके एन.टी.,वऱ्हाड बी.ए.,तिर्थकर एस.एस.,जमादार एफ.बी.,पाटील पी.एस.यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, व्यंकटराव चिलवरवार, बसवेश्वर माने,शेरखाने जे.एस.,रमेश आंधळे, यशवंत मकरंद, हरिभाऊ भडके, हाळदे के.एम. जिल्हासचिव गणेश आजबे, रविंद्र वाकोडे, भाई चंद्रकांत चव्हाण, माने जी.व्ही.,विक्रम मायाचारी,संजय यळवंते, कदम एन.टी.,ढेंगळे व्ही.एस.,दिनेश पाटील, बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष तथा मार्गदर्शक डी.जी.तांदळे यांची नावे आहेत.


# डॉ.अनुश्री पुरी (बन) यांना महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्ड 2025 च्या पुरस्काराने गौरविण्यात आले

**" सुप्रसिद्ध अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते गौरव "**

महागाव | प्रतिनिधी

रिसील डॉट इन (शुअर मी मल्टीपर्पज प्रा. लि.व इंडिया आयकॉन मॅगझिन तर्फे दिनांक 3 फेब्रुवारी 2026 रोजी नाशिक येथील महाराष्ट्र या महामंचावर सुप्रसिद्ध अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयाच्या समाजशास्त्र प्र. विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या महिला उद्योजक म्हणून प्रा.डॉ.अनुश्री अनिल पुरी (बन) यांना महाराष्ट्र बिझनेस आयकॉन 2025 चा पुरस्कार सुप्रसिद्ध मराठी सिनेअभिनेत्री मा.प्रार्थना बेहरे यांच्या हस्ते महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. या अवॉर्ड सोहळाला मा.श्री.सुधीर कुमार पठाडे मराठी फिल्म प्रोड्युसर तथा फाउंडर व मुख्यकार्यकारी अधिकारी रिसिल अवॉर्ड्स यांची उपस्थितीत लाभली असुन महाराष्ट्रातील उद्योजक आणि रिशील डॉट इन या टीमच्या उपस्थिती हा पुरस्कार सोहळा पार पडला.

डॉ.अनुश्री पुरी यांना तालुका महिला अध्यक्ष, लघु उद्योग भारती पुसद व ऐश्वर्या ऍग्रो इंडस्ट्रीजच्या प्रोप्रायटर महिला उद्योजक म्हणून कच्ची घाणी खाद्य तेलाचा व्यवसाय उभा केला असून या व्यवसाय अंतर्गत कच्ची घाणी खाद्यतेलाचे अनेक प्रकारचे तेल तयार केल्या जाते. त्यामध्ये शेंगदाणा,सूर्यफूल, सरसो,जवस, तीळ करडी, खोबरेल इत्यादी तेलाचे उत्पादन त्यांनी स्वतः तयार केले आहेत. या तेला सोबतच शेंगदाणा, जवस, तीळ इत्यादी तेल बियाच्या ढेपीपासून खाण्याकरिता अनेक प्रकारच्या चटण्या व मसाले बनवले आहेत,त्यांनी गृहीणींना व ग्राहकांना या विषयी



वेळोवेळी सविस्तर माहिती देऊन आरोग्यासाठी किती उपयोगी आहे व कमी खर्चामध्ये प्राकृतिक पद्धतीने तयार करण्यास आणि स्वयंपाकगृहात ढेप महत्त्वाची आहे याचे महत्व पठवून देऊन अनेक महिलाना व ग्राहकांना मदतीचा हात पुढे केलेला आहे. अनेकांचा असा समज होता की, ढेप हि फक्त गुरांचा खाद्य आहे .पण तसे नसून ढेप हि मानवाच्या आरोग्यासाठी किती उपयोगी आहे.हे त्यांनी त्यांच्या प्रत्यक्ष कृतीतून महिला व ग्राहकापर्यंत या व्यवसायच्या माध्यमातून पोहचला आहे तसेच ग्राहक जोडण्यात त्या यशस्वी ठरल्या आहेत.

त्याच्या सकारात्मक विचारातून प्राध्यापक ते महिला उद्योजक म्हणून इंडिया आयकॉन मॅगझिन मध्ये त्यांच्या व्यवसायाची यशोगाथा आर्टिकल सुद्धा छापण्यात आले आहे. त्या सोबतच सुप्रसिद्ध अभिनेत्री मां.वर्षा ऊसगावकर, मा.अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, मा.अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या समवेत महाराष्ट्रचा अभिमान व उद्योजकाचा सन्मान अश्या क्रिएटिव्हचा सन्मान मिळाला असून समाचार वाणी न्यूज या चॅनलवर कच्ची घाणी खाद्य तेल या यशस्वी व्यवसायाची मुलाखात घेण्यात आली आहे.डॉ.अनुश्री पुरी हया महाराष्ट्र बिझनेस आयकॉन विजेत्या ठरल्या आहे.

